# मुंबई विद्यापीठ

<u>निवडणूक विभाग</u>

क्र.नि.वि./आयसीडी/२०१७-१८/ ८१७ /२०१८

**परिपत्रक:-**

कृपया विद्यापीठाचे परिपत्रक वितरित क्र.नि.वि./आयसीडी/२०१७-१८/२०२ /२०१७, दिनांक २१ जुलै, २०१७ पहावे सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या विभागाचे विभागप्रमुख, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक, स्वायत्त संस्था/महाविद्यालये, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षण संस्थांचे अध्यक्ष/सचिव, प्राध्यापक-नि-संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र आणि समन्वयक, ठाणे उपकेंद्र यांना असे निर्देशित करण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२, यांनी <u>क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र. २७९/विशि-३</u> दिनांक २२ जून, २०१७ (प्रत संलग्न) अन्वये ४ विद्याशाखांमध्ये विविध विषयाचा समावेश करण्यात आला आहे.

शिक्षकांच्या निवडणूकीसाठी मतदार यादी तयार करताना असे निदर्शनास आले आहे की, महाविद्यालयीन अध्यापकांनी निवडणूकीकरीता नावनोंदणी करताना जुन्याच विद्याशाखेप्रमाणे अर्ज भरला आहे व त्यानुसार मतदार यादीत समावेश करण्यात आला आहे.

या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, जर एखादया उमेदवाराने जुन्या विद्याशाखेप्रमाणे अर्ज भरला असेल व त्यानुसार विद्याशाखेत त्याच्या नावाचा उल्लेख केला असेल तरी त्यांची विद्याशाखा शासन पत्र क्र. २०१७/प्र.क्र.२७९/विशि-३ दिनांक २२ जून, २०१७ नुसार समजण्यात येईल व त्यानुसार त्याचा उमेदवारी अर्ज ग्राहय धरण्यात येईल.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २३ फेब्रुवारी, २०१८

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव

प्रति,

मुंबई विद्यापीठाच्या विभागाचे विभागप्रमुख, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक, स्वायत्त संस्था/महाविद्यालये, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षण संस्थांचे अध्यक्ष/सचिव, प्राध्यापक-नि-संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र आणि समन्वयक, ठाणे उपकेंद्र

# मुंबई विद्यापीठ

निवडणूक विभाग

क्र.नि.वि./आयसीडी/२०१७-१८/ २०२ /२०१७

दिनांक : २१ जुलै, २०१७

**परिपत्रक:-**

मुंबई विद्यापीठाच्या विभागांचे विभागप्रमुख, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थांचे संचालक, स्वायत्त संस्था/महाविद्यालये, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षण संस्थांचे अध्यक्ष/सचिव, प्राध्यापक-नि-संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र आणि समन्वयक, ठाणे उपकेंद्र यांना असे निर्देशित करण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२, यांनी क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२७९/विशि-३, दिनांक २२ जून, २०१७ (प्रत संलग्न) अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार ४ विद्याशाखांमध्ये अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत निर्णय घेतला आहे. सदर शासन निर्णय योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

मुंबई - ४०० ०३२
दिनांक - २१ जुलै, २०१७.

(डॉ. एम.ए.खान)
कुलसचिव

प्रति,

मुंबई विद्यापीठाच्या विभागांचे विभागप्रमुख, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थांचे संचालक, स्वायत्त संस्था/महाविद्यालये, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष/सचिव, प्राध्यापक-नि-संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, समन्वयक, ठाणे उपकेंद्र

महाराष्ट्र शासन

क्र: संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२७९/विशि-३
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : २२ जुन,२०१७

UNIVERSITY OF MUMBAI
23 JUN 2017
8681

प्रति,

कुलगुरू/ कुलसचिव
सर्व अकृषी विद्यापीठे.

24 JUN 201

विषय:- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार ४ विद्याशाखांमध्ये अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत.

महोदय,

दि.८.६.२०१७ रोजी मा.मंत्री (उ.व त.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली सर्व अकृषी विद्यापीठांतील कुलगुरू व इतर संबंधीत अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत कोणते अभ्यासक्रम कोणत्या विद्याशाखेमध्ये समाविष्ट करावे याबवत विद्यापीठांना काही शंका असल्यास सदरहू शंका डॉ.आर.एस.माळी, माजी कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या समितीने संबंधीत विद्यापीठांशी चर्चा करून त्यानुषंगाने योग्य त्या मार्गदर्शक सूचना द्याव्यात असे निर्देश मा.मंत्री (उ.व तं.शि.) यांनी दिले होते.

३. त्यानुषंगाने डॉ.आर.एस.माळी, माजी कुलगुरू, यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३.६.२०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे झालेल्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

४. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये असलेल्या ४ विद्याशाखांमध्ये महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मध्ये नमूद केलेल्या विद्याशाखांमध्ये महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मध्ये नमूद केलेल्या विद्याशाखांमध्ये खालीलप्रमाणे समावेश करंण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

| Sr. No | Faculties as per the Act, १९९४ | Faculties as per the Maharashtra Public University Act,२०१६ |
|---|---|---|
| १. | Science | Science and Technology |
| २. | Pharmacy | |
| ३. | Engineering | |
| ४. | Technology | |
| ५. | Architecture | |
| १. | Commerce | Commerce and Management |
| २. | Management | |
| १. | Arts | Humanities |
| २. | Mental, Moral & Social Sciences | |

| | | |
|---|---|---|
| ३ | Law | |
| १ | Education | Interdisciplinary |
| २. | Physical Education | |

याशिवाय प्रत्येक विद्यापीठामध्ये असणारे Fine Arts, Performing Arts, Journalism, Social work, Library and Information Science, B.Voc (Non Science Subject), Home Science (Non Science Subject), हे विषय व या सारखे विषय हे Interdisciplinary Studies या विद्याशाखेमध्ये एकत्रित करण्यात यावेत असाही निर्णय सदरहू बैठकीमध्ये घेण्यात आलेला आहे.

तरी त्याअनुषंगाने सर्व अकृषी विद्यापीठांनी आपल्या स्तरावर उचित ती कार्यवाही करावी.

आपला,

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-
मा.मंत्री (उ.व तं.शि.) यांचे खाजगी सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री (उ.व तं.शि.) यांचे खाजगी सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
मा.अ.मु.स. (उ.व तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
सह सचिव (विशि) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती (विशि-३)